# कान फुंकणाऱ्यांमुळे खडसे अडचणीत

## पालकमंत्री गुलाबराव पाटील : भुसावळ येथे जाहीर सत्कार

सकाळ वृत्तसेवा

भुसावळ, ता. २७ : खडसे यांनी ज्यांना जवळ केलं त्यांचा रक्त ग्रुप तपासला नाही. कानं फुकणांऱ्या लोकांमुळेच नाथाभाऊ आज अडचणीत आले आहेत, असा टोला शिवसेनेचे उपनेते तथा पाणी पुरवठा मंत्री गुलाबराव पाटील यांनी लगावला.

जळगाव जिल्ह्याचे पालकमंत्रीपद मिळाल्यानंतर गुलाबराव पाटील मित्र मंडळातर्फे रविवारी (ता. २६) भुसावळ येथे त्यांचा जाहीर सत्कार करण्यात आला. या सत्काराला उत्तर देताना ते बोलत होते. याप्रसंगी व्यासपीठावर आमदार संजय सावकारे, नगराध्यक्ष रमण भोळे, जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष लालचंद पाटील, नगरसेवक मनोज बियाणी, युवराज लोणारी, प्रा. सुनील नेवे, पिंटू ठाकूर, दीपक धांडे, राजेंद्र दायमा, जगदीश कापडे, बापू महाजन, प्रमोद सावकारे, राजेंद्र आवटे, संतोष बारसे, सतीश सपकाळे, निक्की बतरा, राजू पारीख, सुमीत बऱ्हाटे, जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष नंदकिशोर महाजन, पवन सोनवणे, रमेश मकासरे, रवी सपकाळे, राजू सूर्यवंशी आदी उपस्थित होते.

यावेळी खडसे यांच्या बाबतीत बोलताना गुलाबराव पाटील म्हणाले की, नाथाभाऊ राजकारणातले आमचे बाप आहेत ते मोठ्या मनाचेही होते आणि राजकारणात तसच राहायला पाहिजे. मात्र कानं फुकणारे लोकांमुळेच नाथाभाऊ आज अडचणीत आले. एकनाथराव खडसे यांनी माझ्यावर मुलासारखं प्रेम केलं. मात्र मला मुलगा कधीच मानलं नाही. लोकसभा निवडणुकी प्रमाणेच विधानसभा निवडणुकीनंतर जर देवेंद्र फडणीस शाल श्रीफळ घेऊन मातोश्रीवर गेले असते, तर आज ही वेळ आलीच नसती तेव्हाच समेट झालं असते. कारण उद्धव ठाकरे यांना मुख्यमंत्री होण्याची कोणतीही इच्छा नव्हती, ते अगदी साधा सुधा देव माणूस आहेत, अशा शब्दात गुलाबराव पाटील यांनी आपले मत व्यक्त केले आहे.

**मंत्र्यांच्या हस्ते गौरव**

स्वतःचा जीव धोक्यात घालून तापी नदीत बुडणाऱ्या युवकाचा जीव वाचवणारे किशोर लोणारी व अशोक सोनवणे तसेच गायीवर मोफत औषध उपचार करणारे पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. भरत महाजन यांचा यावेळी कॅबिनेट मंत्री गुलाबराव पाटील यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

**सावकारे व माझे लव्ह मॅरेज**

कॅबिनेट मंत्री झाल्याबद्दल गुलाबराव पाटील यांचा जिल्ह्यातील पहिला नागरी सत्कार भुसावळला करण्यात आला. आमदार संजय सावकारे अध्यक्षस्थानी होते. यावेळी भाजपचे जिल्हा सरचिटणीस प्रा. डॉ. सुनील नेवे यांच्या भाषणाचा धागा पकडत त्यांनी खडसे यांच्याविषयी नाराजी व्यक्त केली. आमदार संजय सावकारे यांचे कौतुक केले. सावकारे पालक मंत्री असताना मी त्यांच्याकडे काम घेऊन जायचो त्यावेळी ते सहज काम करायचे त्यांच्या स्वभावामुळे ते सगळ्यांना आपलेसे वाटतात. त्यामुळेच त्यांचे व माझे लव मॅरेज झाले आहे आमची दोस्ती कायमची आहे, असे सांगायलाही ते विसरले नाही. एवढेच नव्हे तर सावकारे हे सर्वांचे आहे असे सांगतानाच त्यांनी ते दुसरे साईबाबा असल्याची उपमा त्यांना दिली.



भुसावळ : पालकमंत्री गुलाबराव पाटील यांचा सत्कार करताना आमदार संजय सावकारे, मनोज बियाणी, रमण भोळे, पिंटू ठाकूर आदी.


ताज्या बातम्यांसाठी पाहा... www.agrowon.com


**तडजोड योजनेच्या सादरीकरणासाठी मागणी किंवा कॉर्पोरेट कर्जदारासाठी तरतूद : मे. ॲपेक्स बिल्डसिज लिमिटेड**

(कंपनी कायदा २०१३ (२०१३ चा १८) च्या कलम २३० अंतर्गत इन्सॉल्व्हन्सी अँड बँकक्रप्टसी बोर्ड ऑफ इंडिया (लिक्विडेशन प्रोसेस) रेग्युलेशन्सच्या २बी रेग्युलेशन्ससह वाचावा).

कॉर्पोरेट कर्जदाराचे नाव : **मे. ॲपेक्स बिल्डसिज लिमिटेड**
**(CIN : L45400DL1993PLC051603)**

**नोंदणीकृत कार्यालय** : बी-२९२, चंद्रकांता कॉम्प्लेक्स, शॉप नं. ७, मेट्रो पिलर नं. १६१ जवळ, न्यू अशोकनगर, नवी दिल्ली ११० ०९६.

**कॉर्पोरेट कार्यालय** : सी-५६/४१, सेक्टर ६२, नोएडा २०१ ३०३.

**खालील ठिकाणचे वर्क्स/ युनिट** : इंडस्ट्रियल प्लॉट क्र. ११, सेक्टर ९, इंडस्ट्रियल इंटिग्रेटेड इस्टेट, पंतनगर, रुद्रापूर पोस्ट ऑफिस, उधमसिंगनगर, उत्तराखंड २६३ १५३.
-एमआयडीसी प्लॉट नं. डी-३, उमरेड इंडस्ट्रियल एरिया, चंद्रपूर रोड, तालुका उमरेड, जिल्हा नागपूर ४४१ २०३.

तडजोड योजनेच्या सादरीकरणासाठी मागणी किंवा कंपनी कायदा २०१३ चे कलम २३० अंतर्गत इन्सॉल्व्हन्सी अँड बँकक्रप्टसी बोर्ड ऑफ इंडिया (लिक्विडेशन प्रोसेस) नियमन, २०१६ च्या २बी सह वाचावा. मे. ॲपेक्स बिल्डसिज लिमिटेडचे धनको/ किंवा धनकोंचा कोणताही वर्ग/ सदस्य किंवा सदस्यांचा कोणताही वर्ग यांनी नोंद घ्यावी.

**कृपया काळजीपूर्वक नोंद घ्यावी की, तडजोड किंवा तरतूदींच्या अशा योजनेच्या कोणत्याही प्रकारांमध्ये मे. ॲपेक्स बिल्डसिज लिमिटेड भाग असणार नाहीत, कॉर्पोरेट कर्जदाराच्या दिवाळखोरीचा ठरावासाठी ठराव योजना सादर करण्यासाठी इन्सॉल्व्हन्सी अँड बॅंकक्रप्टसी कोड, २०१६ (''कोड'') अंतर्गत जे पात्र नाहीत अशी व्यक्ती.**

इच्छुक धनको/ किंवा धनकोंचा कोणताही वर्ग किंवा सदस्यांच्या कोणत्याही वर्गाने संबंधित तपशिलासाठी आणि प्रक्रिया कागदपत्रे योजना सादर करण्यासाठी **www.arck.in** किंवा **www.apexbuildsys.com** या संकेतस्थळाला भेट द्यावी. अंतिम योजना सादरीकरणाचा अंतिम दिनांक २८-०२-२०२० आहे. याबाबत कोणतीही शंका असल्यास कृपया खालील ई-मेल **insolvency@arck.in** किंवा **narangcg58@gmail.com** वर संपर्क साधावा.

**ग्यानचंद नारंग**
लिक्विडेटर : मे. ॲपेक्स बिल्डसिज लिमिटेड (दिवाळखोरीमध्ये)
नोंदणीकृत क्र.: IBBI/IPA-002/IP-N00362/2017-18/11031
नोंदणीकृत पत्ता : फ्लॅट क्र. २१४, ब्लॉक-बी-२, वरूण अपार्टमेंट सेक्टर-९, रोहिणी, नवी दिल्ली ११० ०८५

दि. : २८-०१-२०२०
ठिकाण : नवी दिल्ली

**संपर्कासाठीचा पत्ता** : ४०९, चौथा मजला, अन्सल भवन १६ के.जी. मार्ग, कॅनॉट प्लेस, नवी दिल्ली ११० ००१

# युरिया खतातील लिंकिंग रोखावी

## साहेबराव पाटलांची जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार



अमळनेर, ता.२७ : सध्या रब्बी हंगाम सुरू असून, शेतकऱ्यांची युरिया खतात लिंकिंग सुरू आहे. परिणामी शेतकऱ्यांना अव्वाच्या सव्वा भावाने खत खरेदी करावी लागत असून, पुरवठाही कमी असल्याने शेतकऱ्यांची वणवण होत आहे. युरिया खतातील लिंकिंग रोखण्यात यावी, अशी मागणी माजी आमदार कृषिभूषण साहेबराव पाटील यांनी केली आहे.

साहेबराव पाटील यांनी दिलेल्या पत्रात म्हटले आहे, की गेल्या पंधरा दिवसापासून युरिया खताचा पुरवठा कंपनीकडून अत्यंत कमी होत आहे. ऐन रब्बी हंगामात शेतकरी वर्ग युरिया खतासाठी वणवण फिरत आहेत. दुकानदार प्लेन युरिया देण्यास नकार देत आहेत. कारण विचारल्यास कंपनीच युरिया बरोबर इतर खताची लिंकींग करीत आहे. त्यामुळे दुकानदार कृषी निविष्ठाधारक युरिया खताचा पुरवठा शेतकऱ्यांना देऊ शकत नाही. त्यामुळे युरिया खत अवाच्या- सव्वा भावात शेतकरी वर्गाला नाइलाजास्तव घेणे भाग पडत आहे. तरी या आवश्यक बाबींबाबत होत असलेल्या लिंकींगला युद्धपातळीवर रोखणे व युरिया पुरवठा सुरळीत कसा होईल, याकडे लक्ष द्यावे. शेतकऱ्यांना न्याय द्यावा, अशी मागणीही त्यांनी केली आहे. ही तक्रार त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांसह जिल्हा कृषी अधीक्षक व तालुका कृषी अधिकाऱ्यांकडेही केली. संबंधित वितरकांची चौकशी करावी, अशी मागणीही शेतकऱ्यांनी केली आहे.

# फत्तेपुरात फोटो स्टुडिओमध्ये चोरी

फत्तेपूर (ता. जामनेर), ता. २७ : येथील प्रवासी निवाऱ्याला लागूनच असलेल्या फोटो स्टुडिओची भिंत फोडून चोरट्यांनी २२ हजारांच्या वस्तू चोरून नेल्या. ही घटना आज सकाळी उघडकीस आली. अकरा दिवसांत ही दुसरी घटना घडली. स्टुडिओच्या खिडकी खालील भिंत फोडून आत प्रवेश केला. स्टुडिओचे मालक २६ जानेवारीला दुपारी दोनला बंद करुन घरी गेले. त्यांना आज सकाळी पंकज फुलफगर यांनी चोरी झाल्याचे कळविले. विशाल समाधान जगताप यांनी फत्तेपूर पोलिसांकडे दिलेल्या तक्रारीत नमूद केल्यानुसार सोनी कंपनीचा कॅमेरा १८ हजार, पाच मेमरी कार्ड ४ हजार अशा २२ हजार रुपयांच्या वस्तू चोरट्यांनी लांबविल्या.





